भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. २०१/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २०/०३/२०१७

**१) मोटार सायकलची चोरी . :–**

दिनांक १८/०३/२०१७ चे ०७.१५ ते १५.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी पुरुषोत्तम गोविंदा लांजेवार वय ४६ वर्ष, रा. विरसी यानी आपली मोटार सायकल जुनी हिरो होंडा स्पलेंडर क्र. एमएच ३६ एन ९३२२ किंमती २५,०००/–रु. ची कापगते पेट्रोलपंप साकोली समोर ठेवुन नागपुरला गेला असतांना नागपुर वरुन परत येवुन पाहीले असता मोटार सायकल दिसुन न आल्याने शोध घेतला असता मिळुन आली नाही. ती कोणीतरी अज्ञात चोराने सुना मौका पाहुण चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बागडे पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

**२) शेतातील मोटार पंप व केबल वायरची चोरी . :–**

दिनांक १८+१९/०३/२०१७ चे रात्र. दरम्यान यातील कोणीतरी अज्ञात चोराने सुनामौका पाहुन फिर्यादीचे शेतातील विहीरीवर लावलेली सिआरआय कंपनीची १.५ हॉर्स पॉवर मोटार पंप किंमती ६,०००/–रु. ची व मोटारीला लावलेला १५ फुट केबल वायर किंमती ३००/–रु. असा एकुण ६,३००/–रु. चा माल चोरुन नेल्याने फिर्यादी रविंद्र गणपत झोळे वय ३९ वर्ष, रा. बारवा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन दिघोरी येथे कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कठाणे पो.स्टे. दिघोरी हे करीत आहेत.

**३) अती दारुचे सेवन केल्याने औषधोपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु . :–**

दिनांक १९/०३/२०१७ चे ०६.५० वा. दरम्यान यातील मृतक जयदेव लटारु भोयर वय ४५ वर्ष, रा. कांद्री याने अती दारुचे सेवन केल्याने त्यास औषधोपचारा करीता सा. रु. भंडारा येथे अती दक्षता विभागा मध्ये भरती केले असतांना उपचारा दरम्यान मरण पावल्याने डॉ. मेमो वरुन पो. स्टे. भंडारा येथे मर्ग क्र. ००/१७ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र पोस्टेला प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. परतेकी पोस्टे आंधळगाव यांचे रिपोर्ट वरुन पोस्टे आंधळगाव येथे कलम १७४ जाफौ. चा नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सोलंकी पोलीस स्टेशन आंधळगाव हे करीत आहे.

**४) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–**

दिनांक १९/०३/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली १०१ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी ०२, तीन सिटर वाहनांवरती ०७ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ९२ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.